GOVERNMENT OF MAHARASHTRA

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

नविन मध्यवर्ती इमारत, १ ए. बी. रोड, पुणे-४११ ००१,

**ईमेल - drcsgdca@gmail.com दूरध्वनी क्र. ०२०-२६१२२८४६/४७**

क्र.प.वप्र./जीडीसीएपरीक्षा/अधिसूचना/२०२६/१६, दिनांक - ०७/०१/२०२६

## ** अधिसूचना **

**शासकीय सहकार व लेखा पदविका मंडळ (जी. डी. सी. ॲण्ड ए. बोर्ड), पुणे –**

**सदर मंडळाकडून दिनांक २६, २७ व २८ मे, २०२६ रोजी घेण्यात येणा-या शासकीय सहकार व लेखा पदविका (जी. डी. सी. ॲण्ड ए.) परीक्षा व सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी. एच. एम.) परीक्षेच्या कार्यक्रमाची अधिसूचना –**

**शासकीय सहकार व लेखा पदविका (जी.डी.सी.अँड ए.) परिक्षा व सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी.एच.एम.)** परीक्षा राज्यातील अहिल्यानगर, अकोला, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, जळगांव, कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी व ठाणे अशा सतरा जिल्हयांच्या ठिकाणी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे नियंत्रणाखाली **दिनांक २६, २७ व २८ मे,२०२६** रोजी घेण्यात येणार आहे.

परिक्षार्थीकडून **ऑनलाईन** पध्दतीनेच अर्ज स्वीकारण्यात येतील. Online Application व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारे या परिक्षेसाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची सर्व परिक्षार्थींनी नोंद घ्यावी.

**ऑनलाईन अर्ज भरताना तयार केलेला स्वत:चा User ID व Password परिक्षार्थींनी परिक्षेचा निकाल प्रसिध्द होईपर्यंत योग्य प्रकारे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी परिक्षार्थ्याची असेल.**

**परीक्षेच्या कार्यक्रमाबाबत ठळक बाबी**

| | |
|---|---|
| शासकीय सहकार व लेखा पदविका (जी.डी.सी.ॲण्ड ए.) व सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी.एच.एम.) परीक्षेच्या तारखा | दिनांक : २६, २७ व २८ मे, २०२६ |
| परिक्षा केंद्रे | अहिल्यानगर, अकोला, अमरावती, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर , जळगांव, कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी व ठाणे |
| Online अर्ज भरण्याची मुदत | दि. ०९/०१/२०२६ पासून दि. २३/०२/२०२६ पर्यंत |
| Online Application साठी Website | **https://gdca.maharashtra.gov.in** |

१. परीक्षेचे ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दि. ०९/०१/२०२६ पासून दि. २३/०२/२०२६ पर्यंत आहे.

२. या परीक्षेस नव्याने बसू इच्छिणा-या परिक्षार्थींना तसेच पूर्वी परीक्षेस बसलेल्या परंतु अनुत्तीर्ण झालेल्या परिक्षार्थींना बसता येईल.

३. **परिक्षा केंद्राचे नाव केंद्र संकेतांक (सेंटर कोड) :-**

परिक्षार्थींना खाली नमूद १६ परीक्षा केंद्रांपैकी कोणत्याही एका केंद्राची निवड करावी लागेल. एकदा निवडलेले केंद्र पुन्हा बदलता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

| केंद्र | मुंबई | ठाणे | नाशिक | जळगाव | अहमदनगर | पुणे | सोलापूर | सातारा | सांगली |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संकेतांक | ०१ | ०२ | ०६ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ |
| केंद्र | कोल्हापूर | छ.संभाजी नगर | लातूर | अकोला | अमरावती | नागपूर | चंद्रपूर | रत्नागिरी | |
| संकेतांक | १४ | १५ | २१ | २३ | २४ | २७ | २९ | ३० | |

**४. परिक्षेसाठी शैक्षणीक पात्रता / अनुभव पात्रता :-**

➢ परिक्षार्थी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असला पाहीजे.

**- किंवा —**

➢ सहकार खाते, कृषि उत्पन्न बाजार समिती आणि सहकारी संस्थांमध्ये कार्यरत असलेले बिगर पदवीधर कर्मचारी ज्यांची

१) एच.एस.सी. उत्तीर्ण झाल्यानंतर -- ३ वर्षे सेवा पूर्ण झाली असली पाहिजे.

२) एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्यानंतर -- ५ वर्षे सेवा पूर्ण झाली असली पाहीजे.

सहकारी संस्थेच्या अथवा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या **बिगर-पदवीधर कर्मचाऱ्यांबाबत अर्ज भरण्याच्या तारखेस परिक्षार्थी सहकारी संस्थेमध्ये कार्यरत असणे आवश्यक आहे.** या सबंधाने संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा अथवा **सक्षम आधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे** (प्रमाणपत्रामध्ये परिक्षार्थींचे नाव, पद, वेतनश्रेणी, जन्मदिनांक, पदस्थापना दिनांक, एस.एस.सी./एच.एस.सी.उत्तीर्ण दिनांक, सेवेमध्ये कायम होण्याची शक्यता आहे / नाही, संस्थेमध्ये सध्या कार्यरत आहे / नाही, या बाबीचा समावेश आवश्यक आहे.)

बिगर-पदवीधर परिक्षार्थी संस्थेत कायम झाला नसल्यास संस्थेकडून कायम करुन घेण्याचे हमी पत्र असणे आवश्यक आहे.

**अर्ज करतेवेळी वरील परिक्षेसाठी शिक्षण / अनुभव याबाबत पात्रता धारण करीत असल्याची परिक्षार्थींनी खातरजमा करुन घ्यावी.**

**५. ऑनलाईन अर्ज भरताना खालीलप्रमाणे स्कॅन प्रती तयार ठेवाव्यात :-**

१) पासपोर्ट साईजचा फोटो (Kb Size)

२) स्वाक्षरी (Kb Size)

३) पदवीधर असल्यास मान्यता प्राप्त विद्यापिठाचे पदवी प्रमाणपत्र (Kb Size)

४) माध्यमिक बोर्डाचे १० वी चे प्रमाणपत्र व गुणपत्र (बिगर-पदवीधर, १०वी पास असल्यास)

५) उच्च माध्यमिक बोर्डाचे १२ वी चे प्रमाणपत्र व गुणपत्र (बिगर-पदवीधर,१२ वी पास असल्यास)

६) जी.डी.सी.ॲण्ड ए. परीक्षेत तसेच सी.एच.एम. परीक्षेत कोणत्याही विषयामध्ये ५० किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असल्यास त्या विषयामध्ये सूट (Exemption) मागता येईल. यासाठी जी.डी.सी.ॲण्ड ए. परीक्षेत तसेच सी.एच.एम. परीक्षेचे मागील गुणपत्रक.
७) अनुभवाचा दाखला- संस्थेचा लेटरहेड वरील योग्य त्या प्राधिकाऱ्यांचे स्वाक्षरीने.
८) कायम करणार असल्याचे हमीपत्र (परिक्षार्थी सेवेमध्ये कायम नसल्यास) - संस्थेच्या लेटरहेड वरील योग्य त्या प्राधिकाऱ्यांचे स्वाक्षरीने.
९) परीक्षा शुल्क चलनाने भरलेस त्याचे स्कॅन प्रत.
**१०) महिलांसाठी नावात बदल असल्यास विवाहित महिला परिक्षार्थींचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र / राजपत्र / प्रतिज्ञापत्र.**

ऑनलाईन अर्ज भरताना वरीलप्रमाणे स्कॅन प्रती तयार असणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज स्वीकृतीसाठी वरील आवश्यक स्कॅन अपलोड (upload) करणे गरजेचे आहे याची कृपया नोंद घ्यावी. अन्यथा संगणक प्रणालीमध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही.

**६. परिक्षा शुल्क :-**

१) जी.डी.सी.ॲण्ड ए. परीक्षा फी रु. ८००/-
२) सी.एच.एम. परीक्षा फी रु. ५००/-

- सदर रक्कम खालील प्रकारे भरता येईल.
  १) ऑनलाईन पेमेंट अथवा
  २) चलनाद्वारे
- चलनाद्वारे परिक्षा शुल्क भरणा करण्यासाठी लेखाशिर्ष

विभाग - ०४२५-को-ऑपरेशन
प्रधान शिर्ष - ८००-अदर रिसिट्स
उपप्रधान शिर्ष - (ix)-एक्झामिनेशन फी
संगणक सांकेतांक - (०४२५०१२५)

- **अस्वीकृत झालेल्या अर्जाचे शुल्क कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.**
- **अर्जदारास ऑनलाईन अर्ज / बँकेचे शुल्क अधिकचे भरावे लागेल.**

**७. विशिष्ट विषयांसाठी सूट मिळण्याबाबत :-**

१) सन २००१ व त्यापूर्वीच्या जी.डी.सी.अँड ए. परीक्षेतील गुणांच्या आधारे विषयांमध्ये सूट मिळणार नाही.
२) यापूर्वी जी.डी.सी.ॲण्ड ए परीक्षेमध्ये अथवा सी.एच.एम. परिक्षेमध्ये कोणत्याही विषयामध्ये किमान ५० गुण प्राप्त झाले असल्यास त्या विषयांकरिता संबंधीत परिक्षांमध्ये सूट मागता येईल. (वरील अट क्र.१ च्या आधीन राहून)
३) सी.एच.एम.प्रमाणपत्राच्या आधारे जी.डी.सी.ॲण्ड ए.परिक्षेचे विषय १ / २ / ३ साठी सूट मागावयाची असल्यास त्यासाठी जी.डी.सी.ॲण्ड ए. परीक्षेची ५० मार्काची अट लागू राहील.

| Exemptions according to Old Syllabus by obtaining 50% marks (upto 2012) | Exemptions under new syllabus |
|---|---|
| Paper III- Cooperative Law & other Laws | Paper V |

| | |
|---|---|
| Paper IV- Accounts | Paper II |
| Paper V- Cooperative Audit | Paper III |
| Paper VI- Banking | Paper VI |
| Both Paper I - Theory & History of Cooperation and Paper II- Cooperative Management | Paper IV- History, Principles & Management in Co-operation |

Those who are unable to exempt either in Paper I and/or Paper II of old syllabus, will have to appear for Paper I Co-operative Housing and Paper IV- History, Principles & Management in Co-operation according to new syllabus. (सन संदर्भ - शासन अधिसूचना क्र.सहक – १२११/प्र.क्र.२७३/१२-स, दि.३०/१०/२०१२)

**८. पदविका आणि प्रमाणपत्र :-**

१) जी.डी.सी.अ‍ॅण्ड ए. परिक्षेचे सर्व सहा विषय उत्तीर्ण होणा-या परीक्षार्थींना "सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन (सी.एच.एम.) सह शासकीय सहकार व लेखा पदविका (जी.डी.सी.अ‍ॅण्ड ए.)" परीक्षेचे प्रमाणपत्र आणि "जी.डी.सी.अ‍ॅण्ड ए." परीक्षेचे गुणपत्रक देण्यात येईल.

२) सी.एच.एम. परिक्षेचे सर्व तीन विषय उत्तीर्ण होणा-या परीक्षार्थींना "सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन (सी.एच.एम.) परीक्षेचे प्रमाणपत्र" आणि "सी.एच.एम". परीक्षेचे गुणपत्रक देण्यात येईल.

३) जी.डी.सी.अ‍ॅण्ड ए. परिक्षेच्या सहा विषयांपैकी पहिले ३ विषय (विषय क्र.१ मॅनेजमेंट ऑफ को.ऑप.हौसिंग सोसायटीज, विषय क्र. २ अकौंट्स, विषय क्र. ३ ऑडिटिंग) उत्तिर्ण होणाऱ्या परिक्षार्थींना "सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन (सी.एच.एम.)" प्रमाणपत्रासह "जी.डी.सी.अ‍ॅण्ड ए." परिक्षेचे गुणपत्रक देण्यात येईल.

**९. परिक्षेचे नियम व अभ्यासक्रम :-**

यासाठी कृपया सहकार विभागाची No: SHK-1211/C.R. 273/12-C, Dated 30/10/2012 ही अधिसूचना पहावी. सदरची अधिसूचना **https://sahakarayukta.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर मुख्यपृष्ठावरील 'महत्वाचे दुवे' मधील "जी.डी.सी. आणि ए. मंडळ" येथे उपलब्ध आहे.

**१०. परिक्षार्थींसाठी महत्वाचे :-**

१) अर्जदाराने विहीत मुदतीतच Online अर्ज भरण्याची कृपया दक्षता घ्यावी. याबाबत बोर्डाकडून कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. तसेच त्यासंदर्भात कोणत्याही पत्रव्यवहाराची बोर्डाकडून दखल घेतली जाणार नाही.

२) जी.डी.सी. अँड ए. परिक्षेसाठी अर्ज केल्यास सी.एच.एम. परिक्षेसाठी वेगळा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

३) ज्यांना फक्त सी. एच. एम. परीक्षा द्यावयाची आहे ते परीक्षार्थी फक्त सी. एच. एम. परीक्षेसाठी अर्ज करु शकतात. जी. डी. सी. अ‍ॅण्ड ए. परीक्षेच्या ६ विषयांपैकी पहिले ३ विषय (विषय क्र.१ मॅनेजमेंट ऑफ को.ऑप.हौसिंग सोसायटीज, विषय क्र. २ अकौंट्स, विषय क्र. ३ ऑडिटिंग) सी. एच. एम. परीक्षेसाठी राहतील.

४) कोणत्याही कारणासाठी एकदा फेटाळण्यात आलेल्या आवेदनपत्राचा फेरविचार केला जाणार नाही. याबाबत बोर्डाचा निर्णय अंतिम राहील.

५) अर्जात खोटी माहिती देणे, अर्जासोबतच्या दस्तऐवजात खाडाखोड करणे या कारणांमुळे परीक्षार्थी परीक्षेसाठी कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरेल व इतर योग्य अशा शिक्षेला पात्र ठरेल.

६) संबंधित अर्जदारांना (परीक्षेचे ठिकाण व आसन क्रमांकासह) या परिक्षेचे प्रवेशपत्र खात्याच्या संकेतस्थळावरून (Website) वरुन डाऊनलोड (Download) करुन घ्यावे लागेल. यासाठी त्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना तयार केलेल्या User ID व Password चा वापर करावा.

७) परिक्षेचे निकाल जाहीर झाल्यानंतर परिक्षार्थींनी त्यांच्या निकालाची छपाई झाल्यानंतर बोर्डाकडून देण्यात येणारी प्रत संबंधीत केंद्रप्रमुख तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयातून एक महिन्याच्या आत स्वत: घेऊन जाणे आवश्यक आहे. जे परिक्षार्थी स्वत: निकाल घेऊन जाणार नाहीत त्यांची प्रत त्यांच्या नोंदलेल्या पत्त्यावर निकाल प्रसिध्द झाल्यानंतर एक महिन्यानंतर साध्या पोस्टाने पाठविण्यात येईल. परिक्षार्थींना पत्त्यात बदल, अपूरा पत्ता वा अन्य कारणामुळे पोस्टाने निकाल प्राप्त न झाल्यास बोर्ड जबाबदार रहाणार नाही याची परिक्षार्थींनी नोंद घ्यावी.

८) ऑनलाईन अर्ज स्वीकारणार असल्याने नाव, कायमचा पत्ता, पत्रव्यवहाराचा पत्ता, पिनकोड, संपर्क क्रमांक, मोबाईल नंबर, Email ID, परिक्षेत सूट (Exemption) हवे असल्यास, याचा तपशील परिक्षार्थींनी बिनचूक नमूद करणे आवश्यक आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

९) अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीचे संगणकावर संस्करण केले जात असल्याने परिक्षार्थींनी दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्यामध्ये मागाहून कोणताही बदल झाल्यास त्याची दखल घेणे बोर्डाला शक्य होणार नाही. म्हणून पत्त्यात बदल झाल्यास परिक्षार्थींनी त्यांच्या अर्जावरील पत्त्यावर येणारी पत्रे नवीन पत्त्यावर परस्पर मिळतील अशी व्यवस्था करावी.

१०) परिक्षेच्या वेळापत्रकात बदल झाल्यास वा इतर अद्ययावत माहिती फक्त https://sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील मुख्यपृष्ठावर "महत्वाचे दुवे मधील जी.डी.सी.ॲण्ड ए. मंडळ" येथे उपलब्ध असेल. त्याकरिता परिक्षार्थ्यांनी सदर संकेतस्थळाचे अवलोकन करत रहावे.

**११. परीक्षेचे वेळापत्रक :-**

| दिनांक व वार | विषय क्रमांक | विषय | गुण | वेळ |
|---|---|---|---|---|
| २६/०५/२०२६ - मंगळवार | १ | सहकारी गृहनिर्माण संस्थांचे व्यवस्थापन (मॅनेजमेंट ऑफ को.ऑप.हौसिंग सोसायटीज) | १०० | सकाळी १०.०० ते १.०० |
| २६/०५/२०२६ - मंगळवार | २ | जमाखर्च (अकौंट्स) | १०० | दुपारी २ .०० ते ५.०० |
| २७/०५/२०२६ – बुधवार | ३ | लेखापरीक्षण (ऑडिटिंग) | १०० | सकाळी १०.०० ते १.०० |
| २७/०५/२०२६ – बुधवार | ४ | सहकाराचा इतिहास,तत्वे व व्यवस्थापन (हिस्ट्री, प्रिन्सिपल्स् ॲण्ड मॅनेजमेंट इन को.ऑपरेशन ) | १०० | दुपारी २.०० ते ५.०० |
| २८/०५/२०२६ - गुरुवार | ५ | सहकारी कायदा व इतर कायदे (को.ऑपरेटिव्ह लॉज् ॲण्ड अदर लॉज) | १०० | सकाळी १०.०० ते १.०० |
| २८/०५/२०२६ - गुरुवार | ६ | सहकारी बँक,संस्था व इतर वित्तीय संस्था (को.ऑपरेटिव्ह बँकिंग ॲण्ड क्रेडिट सोसायटीज) | १०० | दुपारी २.०० ते ५.०० |

सचिव,
जी.डी.सी.ॲण्ड ए. बोर्ड व तथा
उपनिबंधक (परीक्षा व प्रशिक्षण),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

*****